<u>जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड</u>

<u>नगरपालिका प्रशासन विभाग</u>

<u>जाहीर सूचना</u>

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी दि.17.12.2021 रोजीच्या आदेशान्वये, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक 15.12.2021 च्या आदेशानूसार, माहे डिसें-2021 या कालावधीत मुदत समाप्त होणा-या नांदेड जिल्हयातील माहूर नगरपंचायतीच्या ना.मा.प्र. करीता आरक्षित असलेल्या ज्या जागा सर्वसाधारण प्रवर्गाच्या होतील त्या जागांपैकी सर्वसाधारण महिलांकरीता आरक्षित ठेवावयाच्या जागांसाठी सुधारीत फेर सोडतीचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्यानुसार माहूर नगरपंचायतीच्या सदस्य पदांच्या ना.मा.प्र. व ना.मा.प्र. महिला आरक्षणाच्या ऐवजी **सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांची सोडत काढणेसाठीचा कार्यक्रम**, उपविभागीय अधिकारी तथा सहा.जिल्हाधिकारी किनवट. यांचे अध्यक्षतेखाली तहसिल कार्यालय, माहूर येथे (गुरुवार) दिनांक 23.12.2021 रोजी, सकाळी 11.00 वाजता आयोजित करण्यात आला आहे.

तरी माहूर नगरपंचायत क्षेत्रातील सर्व संबंधित नागरीकांनी आरक्षण निश्चितीच्या कार्यक्रमास, सोडतीच्या ठिकाणी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येते.

स्थळः-नांदेड

दि.18.12.2021

**(डॉ.विपीन भाप्रसे)**

**जिल्हाधिकारी नांदेड**